# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

विषय :- प्रभाग क्र. १७ येथील वॉटरवर्क्स कंपाऊंड लगत तयार करण्यांत येणाऱ्या जेष्ठ नागरीक कट्टयास महाराष्ट्र राज्याचे विधान परिषद माजी उपसभापती "स्व. वसंतरावजी डावखरे जेष्ठ नागरीक कट्टा" असे नांव देणे बाबत.

श्री संतोष एम. शेट्टी - माजी नगरसेवक वॉर्ड क्र. १७, यांचे दि. २४/०३/२०२३ रोजीचे पत्रानुसार प्रभाग क्र. १७ मधील वॉटरवर्क्स कंपाऊंड व स्व. देवकी सुंदर शेट्टी बाल उद्यानालगत मनपा मार्फत तयार होत असलेल्या जेष्ठ नागरिक कट्टयास "स्व. वसंतरावजी डावखरे जेष्ठ नागरीक कट्टा" असे नांव देणे बाबत सुचविले आहे. स्व. वसंतरावजी डावखरे हे विधान परिषदेवर ०४ वेळा निवडून आले होते. तसेच सलग २० वर्षे त्यांनी विधान परिषदेचे उपसभापती पद देखील भुषविले होते. भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात विविध विकास कामांकरीता त्यांनी शासन व आमदार निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यास मदत केली होती. तसेच भिवंडीच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरी मुलभूत सोयी सुविधांच्या कामासाठी प्रथम प्राधान्य देऊन शासन दरबारी ते आवाज उठवत होते. विषयांकीत प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरी करिता सादर करण्यांत आला असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २१/०७/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- 289 दिनांक :- ९/०८/२०२३

प्रभाग क्र. १७ मधील वॉटरवर्क्स कंपाऊंड व स्व. देवकी सुंदर शेट्टी बाल उद्यानालगत मनपा मार्फत तयार होत असलेल्या जेष्ठ नागरिक कट्टयास "स्व. वसंतरावजी डावखरे जेष्ठ नागरीक कट्टा" असे नांव देणे बाबत श्री संतोष एम. शेट्टी - माजी नगरसेवक वॉर्ड क्र. १७, यांनी दि. २४/०३/२०२३ रोजीचे पत्रानुसार सुचविले आहे. सदर प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका